मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पालिकेला यंदा गतवर्षीपेक्षा 161 कोटींचे अधिक उत्पन्न

## कर संकलन विभागाकडे 977 कोटींचे उत्पन्न, 5 लाख 11 हजार 154 मालमत्ताधारकांनी भरला कर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कर संकलन व आकारणी विभागाने २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात तब्बल ९७७ कोटी ५० लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. ६ लाख २५ हजार मालमत्ताधारकांपैकी ५ लाख ११ हजार १५४ मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे. कर भरणाऱ्या प्रामाणिक करदात्यांचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आभार मानले आहेत.

महापालिकेच्या उत्पन्नाचा मालमत्ता कर प्रमुख स्त्रोत आहे. महापालिका हद्दीत ६ लाख २५ हजार मालमत्ता आहेत. यापैकी ५ लाख ११ हजार १५४ मालमत्ताधारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे. कर संकलन व आकारणी विभागाने गतवर्षी ८१६ कोटींचा कर वसूल केला होता. यंदा तब्बल १६१ कोटींचा अधिक कर वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे.

गेल्या वर्षभरापासून थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, बड्या थकबाकीदारांची नावे वर्तमानपत्रात नावे प्रसिद्ध करणे, मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया, मीम्स, रिल्स सारखी अनोखी स्पर्धा, शहरात वर्दळीचे ठिकाण, मुख्य चौक, रस्ते इ. ठिकाणी होर्डिंग्ज व फ्लेक्सद्वारे जाहिरात प्रसिद्धी, पॅम्पलेट वाटप, सोशल मीडियाद्वारे चित्रफीत, लाऊडस्पीकरवर थकबाकीदारांच्या नावांची घोषणा करणे, जिंगलद्वारे जाहिरात प्रसिद्धी, कर संवाद अशा माध्यमातून करदात्या थकबाकीदारांमध्ये वेळोवेळी जनजागृती करण्यात केली. मालमत्ताकर वसुलीसाठी नागरिकांना मालमत्ताकराची बिल ऑनलाईन तसेच कर भरण्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. मालमत्ताधारकांचे विविध घटकांसाठी ऑनलाईन व ऑफलाईन कर सवलत योजना, थकीत कर वसुलीसाठी वेळोवेळी घरभेटी देणे, पत्र देणे, जप्ती पूर्व नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात आली.




**वाकड झोनमधून १५४ कोटींचा उच्चांकी कर वसूल**

शहरात कर संकलनासाठी महापालिकेचे १७ झोन आहेत. यामध्ये वाकड झोनमध्ये सर्वाधिक म्हणजे ६८ हजार मालमत्ताधारकांनी १५४ कोटी ५८ लाख रुपयांचा कर जमा केला आहे. त्या खालोखाल सांगवीत ५१ हजार ७१८, चिखलीत ४५ हजार ६३४, थेरगावमध्ये ४५ हजार ४३४, चिंचवडमध्ये ४३ हजार २८६, मोशी ३४ हजार ९८०, भोसरी ३३ हजार ८६७ मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे. तर सर्वात कमी तळवडे झोनमध्ये फक्त ८ हजार ५२७ मालमत्ताधारकांनी कर भरणा केला आहे.

> “
> यंदा सिद्धी प्रकल्पाच्या माध्यमातून बचत गट महिलांकडून बिले वाटप, डाटा अनालिसिस, जनजागृतीसाठी उत्तम क्रिएटिव्ह, सर्व सेवा ऑनलाईन करणे अशा विविध माध्यमातून नागरिकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित केले. सन २०२४-२०२५ या वर्षात सर्वेक्षणातील सर्व नवीन मालमत्तांची कर आकारणी करणे, करविषयक सर्व अभिलेखांचे स्कॅनिंग, डीजिटायझेशन करून लोकाभिमुख होईल याचा प्रयत्न राहील. तसेच सर्व मालमत्तांच्या युपिक आयडीद्वारे पालिकेच्या सर्व सेवा एकत्रित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
> – शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# निगडी ते वाकड व वाकड ते चाकण मेट्रो मार्गांचा प्रस्ताव

## खासदार बारणेंचा महामेट्रोने प्रवास : काही सुधारणा करण्याचीही सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी महामेट्रोने प्रवास करीत प्रवाशांशी संवाद साधला. पिंपरी ते भक्ती-शक्ती या टप्प्यानंतर निगडी-किवळे-रावेत-वाकड तसेच वाकड-नाशिक फाटा-भोसरी-चाकण या दोन नवीन मेट्रो मार्गांचा प्रस्ताव असल्याचे बारणे यांनी यावेळी प्रवाशांना सांगितले.

खासदार बारणे यांनी पिंपरी ते दापोडी दरम्यान महामेट्रोने प्रवास केला. त्यांच्या समवेत शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर पिंपरी चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस युवा सेना जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे तसेच अनेक पदाधिकारी होते.

खासदार बारणे यांनी पाठपुरावा करून पिंपरी ते भक्ती-शक्ती या मेट्रो मार्गाला परवानगी मिळविल्याबद्दल प्रवाशांनी त्यांना धन्यवाद दिले. पुढील टप्प्यामध्ये निगडी-किवळे-रावेत-वाकड या मेट्रो मार्गाचा प्रस्ताव आहे. हा मार्ग शिवाजीनगर-हिंजवडी या मार्गाला जोडला जाईल. या खेरीज वाकड-नाशिक फाटा-भोसरी-चाकण हा मेट्रो मार्ग देखील प्रस्तावित आहे. त्यामुळे शहरातील मेट्रो सेवेचे जाळे बऱ्यापैकी विस्तारले जाणार आहे, अशी माहिती बारणे यांनी यावेळी दिली.

मेट्रोमुळे प्रवास सुखकारक, आनंददायक होत असून वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होत असल्याचे प्रवाशांनी यावेळी आवर्जून सांगितले. मेट्रो स्थानकांजवळ प्रशस्त वाहनतळची सोय व्हावी, अशी अपेक्षा काही प्रवाशांनी व्यक्त केली.



खासदार बारणे यांना मेट्रो स्थानकावर पाहून प्रवाशांना सुखद धक्का बसला. अनेक प्रवाशांनी पुढे येऊन खासदार बारणे यांची भेट घेतली व त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. अनेक प्रवाशांनी मेट्रोच्या कोचमध्ये बारणे यांच्या समवेत सेल्फी देखील घेतले.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवे वर दोन दिवस ब्लॉक

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून जर तुम्ही प्रवास करणार असाल तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत मुंबई व पुणे वाहिनीवर कि.मी. ९३/९०० येथे ३ व ४ एप्रिल २०२४ रोजी दुपारी १२ ते २ या दरम्यान गॅन्ट्री बसवण्यात येणार आहे. त्यामुळे या दिवशी प्रवास करताना पर्यायी मार्गाचा वापर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

द्रुतगती मार्गावरुन पुणे ते मुंबईकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने किवळे मार्गाने मुंबईच्या दिशेने पुण्याकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने कुसगाव टोलनाका कि.मी ५५.००० वरुन येथून जुना मुंबई-पुणे मार्गावरुन पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होतील, असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून कळविण्यात आले आहे.

पावसाळा सुरू होण्याच्या अगोदर महामार्ग प्रशासनाकडून द्रुतगती महामार्गावरील सर्व कामे मार्गी लावण्याचे आव्हान त्यांच्या समोर आहे. त्यात आता उन्हाळ्याची सुट्टी असल्याने अनेकजण आपल्या गावी येण्यासाठी याच मार्गाचा अवलंब करतात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी रस्ते प्रशासनाकडून योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. त्यात आज आणि उद्या ग्रँट बसवण्यासाठी दोन तासांचा ब्लॉक घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 55 हजारांच्या मताधिक्याचा वसंत मोरेंना विश्वास

## प्रकाश आंबेडकर यांनी वसंत मोरे यांना पुणे लोकसभेची उमेदवारी जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

प्रकाश आंबेडकर यांनी वसंत मोरे यांना पुणे लोकसभेची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे आता पुणे लोकसभेच्या निवडणुकीत तिरंगी लढत पाहण्यास मिळणार आहे.

मनसेला सोडचिठ्ठी देणारे नेते वसंत मोरे यांना वंचितकडून उमेदवारी जाहीर झाली आहे. तर पुण्यात काँग्रेसकडून रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी आधीच जाहीर झाली आहे. त्यामुळे पुण्यात आता धंगेकर आणि मोरे यांच्यातही लढत पहायला मिळणार आहे

. वसंत मोरे यांनी मनसेला सोडचिठ्ठी देऊन जवळपास २० दिवसांचा कालावधी होऊन गेला. या संपूर्ण कालावधीत वसंत मोरे यांनी पुणे लोकसभेची उमेदवारी मिळावी यासाठी महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या. पण वसंत मोरे यांना उमेदवारी नाकारत आमदार रविंद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. तर दुसऱ्या बाजूला महायुती कडून भाजपचे नेते मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे वसंत मोरे हे अपक्ष निवडणुक लढणार अशी चर्चा सुरू होती. त्याच दरम्यान वसंत मोरे यांनी वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी केली. त्या सर्व घडामोडी दरम्यान काल रात्री प्रकाश आंबेडकर यांनी वसंत मोरे यांना पुणे लोकसभेची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे आता पुणे लोकसभेच्या निवडणुकीत तिरंगी लढत पाहण्यास मिळणार आहे



वसंत मोरे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की,मागील २५ वर्षापासुन राज ठाकरे यांच्यासोबत काम करत राहिलो. त्या कालावधीत पुणे महापालिकेमध्ये तीन वेळा नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचे सोने केले. या १५ वर्षाच्या नगरसेवक पदाच्या काळात सत्तेमध्ये नसताना देखील कात्रज प्रभागाचा सर्वांगीण विकास केला आहे. कात्रज प्रभाग हा शहरासमोर रोल मॉडेल ठरल आहे. माझ्याकडून प्रभागात सर्व विकास काम सुरू होती.

### राजमार्ग सोडून राजगृहचा मार्ग

त्याच दरम्यान राज ठाकरे यांनी पुणे शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली. ती जबाबदारी देखील चोखपणे बजावत, शहरात पक्ष वाढविण्याचे काम केले.त्या माध्यमातुन लोकसभेची तयारी सुरू केली. पण पक्षातील काहींनी राज ठाकरे यांना माझ्याबद्दल निगेटिव्ह रिपोर्ट पाठवले.

त्यानंतर मी अखेर पक्षामधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मी राज मार्गावर होतो आणि आता राजमार्ग सोडून राजगृहच्या मार्गावर गेलो आहे. पण राज ठाकरे यांच्यापासून दूर गेल्यानंतर मागील १५ दिवस माझ्यासाठी हा कठीण काळ होता अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

तसेच ते पुढे म्हणाले की, मुरलीधर मोहोळ आणि रविंद्र धंगेकर या दोघांसोबत मी पुणे महापालिकेमध्ये एकत्रित काम केले आहे. ते दोघे पण माझे चांगले मित्र आहेत. तसेच मी या निवडणुकीत वैयक्तिक टीका करणार नाही. तर त्यांच्या पक्षाच्या ध्येयधोरण आणि चुकीच्या कारभाराविरोधात सातत्याने भूमिका मांडत राहणार, त्याचबरोबर आजवरचं माझं काम पाहून पुणेकर नागरिक माझ्या पाठीशी उभे राहून मला विजयी करतील असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

### किमान 55 हजारांचे मताधिक्य...

तसेच ते पुढे म्हणाले की, मला उमेदवारी मिळावी याकरिता महाविकास आघाडीच्या नेत्यांना भेटलो. पण मला काही कारणास्तव उमेदवारी मिळाली नाही. मात्र आज वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक प्रकाश आंबेडकर यांनी उमेदवारी देऊन मला काम करण्याची संधी दिली. याबद्दल मी त्यांचा आभारी असून प्रकाश आंबेडकर यांना समाजातील प्रत्येक घटक मानणारा आहे. त्यामुळे या निवडणुकीत मला अधिकाधिक फायदा होईल आणि मी किमान ५५ हजारांच्या मताधिक्याने निवडून येईल असा विश्वास देखील यावेळी त्यांनी व्यक्त केला.

# विवाह मंडपातच वधू-वराकडून मतदानाची शपथ

## नवजीवनाचे पहिले पाऊल सोबतीने मतदानाचा निश्चय करून

**पुणे | प्रतिनिधी**

विवाहाची मिरवणूक निघालेली...फेटे बांधलेले वराती लग्नासाठी निघालेले...सनईच्या स्वरात सर्वांचे मंडपात दिलखुलास स्वागत... आणि लग्नघटीका समिप आली असताना वर-वधूंनी नवजीवनात प्रवेश करताना पहिले पाऊल मतदानाचा संकल्प करून टाकले. त्यांनी इतरांनाही मतदान करण्याचे आवाहन केले.

.आंबेगाव तालुक्यातील जवळे गावात अक्षय लोखंडे आणि उत्कर्षा घोडेकर यांच्या विवाहाची तयारी सुरू कसताना नवरदेवाची स्वारीही आली. अशात स्वीप पथकाच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या मतदान जनजागृती फेरीतील विद्यार्थ्यांनी वऱ्हाडी मंडळीला मतदानाचे आवाहन केले.



त्याला प्रतिसाद देत सर्वांनी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली.

शिरूर लोकसभा मतदार संघाअंतर्गत आंबेगाव विधानसभा मतदार संघातील स्वीप पथक मतदार संघात ठिकठिकाणी मतदान जनजागृती करत आहे. जवळे गावात विवाहाच्या मिरवणुकीत मतदार जनजागृती करून वर-वधू आणि वऱ्हाडी मंडळींना मतदानाचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी सर्वांनी मतदान संकल्प पत्र भरू दिले. या उपक्रमात स्वीप सदस्य नारायण गोरे, तुषार शिंदे, सुनिल भेके, सचिन तोडकर यांच्यासह जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

उत्कर्षा घोडेकर, वधू- जवळे गावात सून म्हणून प्रवेश करताना भारतीय नागरीक आणि आंबेगाव तालुक्यातील सजग मतदार म्हणून मतदान करेल. नागरिकांनीही मतदानात सहभाग घ्यावा.

अक्षय लोखंडे, वर- संसराच्या कर्तव्यासोबत मी देशाप्रती असणारे कर्तव्यही पार पाडणार आहे आणि मतदान करणार आहे.

आंबेगाव विधानसभा मतदार संघातील स्वीप पथक मतदार संघात ठिकठिकाणी मतदान जनजागृती करत आहे. गावात विवाहाच्या मिरवणुकीत मतदार जनजागृती करून वर-वधू आणि वऱ्हाडी मंडळींना मतदानाचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी सर्वांनी मतदान संकल्प पत्र भरू दिले.

### सामाजिक संदेश...

» विवाहात ज्येष्ठांनी आशीर्वाद देतानाच थोरा मोठ्यांचा मान ठेवण्याचा, सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचा संदेश दिला. त्याचे पालन करण्याचा निश्चय करतानाच देशाविषयीचे कर्तव्य म्हणून मतदान करणार असल्याचे सांगितले. नव्या संसाराची सुरुवात येत्या लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचा संकल्प करुन नवविवाहीत जोडप्याने करुन एक मोठा सामाजिक संदेश समाजाला दिला

# पिंपरी-चिंचवडकरांनी भरला कोट्यवधींचा कर

## महापालिका मालामाल.. सहा विभागांतून दोन हजार 53 कोटी 98 लाखांचे उत्पन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेला सरत्या आर्थिक वर्षात मालमत्ता कर, बांधकाम परवानगी, अग्निशमन, पाणीपुरवठा, आकाशचिन्ह व परवाना, भूमी जिंदगी, प्राधिकरण भूखंड हस्तांतरण या विभागांतून दोन हजार ५३ कोटी ९८ लाखांचा महसूल मिळाला आहे. प्रथमच दोन हजार कोटींचा टप्पा पालिकेने पार केला आहे. दरम्यान, गतवर्षी या सहा विभागांतून एक हजार ८७९ कोटी ८३ लाखांचे उत्पन्न मिळाले होते.



महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाला २०२३-२४ या आर्थिक वर्षात एक हजार कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले होते. या विभागाने पहिल्यांदाच ९७७ कोटी ५० लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. बांधकाम परवानगी विभागातून ८०४ कोटी ६९ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीपीसीआर) २०२० नुसार प्रीमियम शुल्काद्वारे ४४३ कोटी ७१ लाख, प्रशमन शुल्कापोटी २३ कोटी १३ लाखांचा भरणा झाला आहे. विकास शुल्क निधीतून ३०८ कोटी ३१ लाख, हस्तांतरणीय विकास शुल्क (टीडीआर) ९१ लाख आणि सुरक्षा शुल्कातून आठ कोटी तीन लाख असे एकूण ८०४ कोटी ६९ लाख रुपयांचे उत्पन्न बांधकाम परवानगी विभागाकडून महापालिका तिजोरीत जमा झाले आहे.

विभागाला ९५० कोटींचे उद्दिष्ट पूर्ण करता आले नाही. अग्निशमन विभागास १६२ कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. अग्निशमन परवाना (ना-हरकत दाखल), फायर लेखापरीक्षण व इतर शुल्कांतून हे उत्पन्न महापालिका तिजोरीत जमा झाले आहे, असे अग्निशमन विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले. शासनाने अग्निशमन परवाना व शुल्काची रक्कम कमी केली आहे. त्यामुळे विभागाचे उत्पन्न घटले आहे. तर, पहिल्यांदाच ७८ कोटी ५७ लाखांची पाणीपट्टी वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे. महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने १८ कोटी ६२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळविले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत एक कोटी ३८ लाख अधिकने उत्पन्न महापालिका तिजोरीत जमा झाल्याचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितले. त्याचबरोबर प्राधिकरणाचे भूखंड हस्तांतरण फी, वारस नोंद आणि भूमी व जिंदगी विभागातून १३ कोटी २९ लाख २१ हजारांचा महसूल महापालिका तिजोरीत जमा झाल्याचे सहायक आयुक्त मुकेश कोळप यांनी सांगितले.

# पवना धरणात 44.72 टक्के पाणीसाठा

## 15 जूननंतर पावसाळा लांबल्यास शहरात पाणीटंचाई अटळ : पवना धरणातील पाणीसाठ्यात घट

**पिंपरी| प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढल्याने बाष्पीभवनामुळे शहरवासीयांची तहान भागविणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठ्यात घट होऊ लागली आहे. आजमितीला धरणात ४४.७२ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे. उपलब्ध पाणीसाठा जूनअखेरपर्यंत पुरेल असा पाटबंधारे विभागाचा अंदाज आहे. मात्र, पावसाळा लांबल्यास मागील साडेचार वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जात असलेल्या नागरिकांना आणखी पाणीटंचाईस सामोरे जावे लागेल, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरासाठी महापालिका पवना धरणातून दररोज ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी घेते. हे पाणी पवना नदीवरील रावेत बंधारा येथून अशुद्ध जलउपसा केंद्रात उचलले जाते. निगडीतील पेठ क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून शहरात पुरविले जाते. गेल्या काही दिवसापांसून आंद्रातून होणारा अपुरा पाणीपुरवठा आता सुरळीत झाला असून, महापालिका ८० एमएलडी पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे येथील बंधाऱ्यातून उचलते. या पाण्यावर चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून चिखली, मोशी, चऱ्होली, भोसरी परिसरात पाणीपुरवठा केला जात आहे.

तर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून महापालिका २० एमएलडी पाणी घेते असे एकूण ६१० एमएलडी पाणी शहराला एका दिवसाला दिले जात आहे. एप्रिल महिना सुरू झाला असून, उन्हाळा तीव्र होत चालला आहे. उन्हाचा पारा चाळिशीपार होऊ लागला आहे. उन्हाच्या झळा आणखी वाढण्याची शक्यता आहे. बाष्पीभवनामुळे पवना धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. धरणात आजमितीला ४४.७२ टक्के पाणीसाठा आहे. वाढत्या उन्हाबरोबरच पाण्याची मागणी वाढली आहे. पाण्याची वाढती मागणी, बाष्पीभवन यामुळे धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.



**गेल्या वर्षीपेक्षा कमी पाणी**

शहराला मुख्यतः मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जात आहे. पवना धरणात आजमितीला ४४.७२ टक्के पाणीसाठा आहे. हा साठा जूनअखेरपर्यंत पुरेल एवढा आहे. गतवर्षी ४६.३७ टक्के साठा होता. गतवर्षीपेक्षा १.६५ टक्क्याने कमी असून, पाण्याची मागणी वाढली आहे.

**पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाईस टाळाटाळ**

पिण्याच्या पाण्याने वाहने, रस्ते, घर, गृहनिर्माण संस्था परिसर धुताना आढळल्यास प्रथम नोटीस बजावण्यात येईल. दुसऱ्यांदा पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करताना आढळल्यास नळजोड तोडण्यात येईल, असा इशारा महापालिकेने दिला होता. त्यानंतरही पिण्याच्या पाण्याने वाहने, अंगण, रस्ते धुण्याचे प्रकार सुरू असून, पाण्याची नासाडी केली जात आहे. मात्र, पाणीपुरवठा विभागाकडून कारवाई केली जात नसल्याचे चित्र आहे. मनुष्यबळ कमी असल्याने कारवाई करता येत नसल्याचे अधिकारी सांगत आहेत.

ऊन वाढत आहे. ऊन वाढल्याने बाष्पीभवनामुळे धरणातील पाणी कमी होत आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पवना धरणाचे शाखा अभियंता रजनीश बारिया यांनी केले.

# मालाला बाजारभाव देण्याची मोदी गॅरंटी नाही

## आंबेगाव तालुक्यात डॉ. अमोल कोल्हे यांच्या गावभेटी, संसदेत आवाज उठवल्याबद्दल आभार

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम भागात खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सोमवार (दि.१) रोजी गावभेट दौरा केला. या दौऱ्यात शेतकऱ्यांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी बिबट्याचे हल्ले, कांदा, सोयाबीन, दुधाच्या बाजारभावबद्दल संसदेत आवाज उठवल्याबद्दल खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे आभार मानले. अनेक जेष्ठ महिलांनी पुन्हा संसदेत जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

एकंदरीत आंबेगाव तालुक्यातील शेतकरी केंद्र सरकारवर प्रचंड नाराज असल्याचे या गावभेट दौऱ्यात आढळून आल्याचे डॉ. कोल्हे यांनी सांगितले. यावेळी कांदा उत्पादक असलेल्या एका महिलेने संवाद साधताना सांगितले की, कांदा लागवडी पासून काढणी पर्यंत ७० ते ८० हजार रुपये खर्च झाला आहे. आता बाजारभाव मात्र पडले आहेत त्यामुळे हातात काहीच शिल्लक राहणार नाही. केवळ माती हातात उरेल अशी परिस्थिती आहे. रासायनिक खतांचे देखील बाजार वाढलेले आहेत. कांदा ठेवावा की बाजारात पाठवावा याची चिंता आहे. गाडी भाडे आणि मजुरांचा रोज देता देखील येत नाही. एवढी बिकट परिस्थिती शेतकऱ्यांवर येऊन ठेपली आहे. आमच्या दुधासाठी, कांद्यासाठी आणि सगळ्या शेतमालासाठी संसदेत भांडा अशी विनंती खासदार डॉ. कोल्हे यांच्याकडे या महिलांनी केली.

दरम्यान, नारोडी (ता. आंबेगाव) येथून सुरू झालेला गावभेट दौरा रात्री उशिरा घोडेगाव परिसरात संपला या दौऱ्यात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेश भोर, आंबेगाव बाजार समितीचे संचालक देवदत्त निकम, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष आंबेगाव तालुकाध्यक्ष धोंडीभाऊ भोर, महिला तालुकाध्यक्षा पूजा वळसे पाटील, यासह अनेक महाविकास आघाडीतील अनेक पदाधिकारी नेते उपस्थित होते.



### शेतकऱ्यांचा नाराजीचा पाढा

गावभेट दौरा सुरू असताना गंगापूर बुद्रुक (ता. आंबेगाव) या गावातील एका शेतात कांद्याची काढणी सुरू असताना थेट शेतात जाऊन डॉ. कोल्हे यांनी कांद्याचा बाजारभाव आणि एकूण परिस्थिती बाबत आढावा घेतला. मजूर महिला, कांदा उत्पादक शेतकरी यांनी डॉ. कोल्हे यांच्याशी बोलताना केंद्र सरकारच्या कांदा निर्यातबंदी धोरणाबाबत नाराजी व्यक्त केली, दूध उत्पादक शेतकरी यांच्यात असलेल्या नाराजीचा पाढा शेतकऱ्यांनी वाचला. .रासायनिक खतांचे देखील बाजार वाढलेले आहेत. कांदा ठेवावा की बाजारात पाठवावा याची चिंता आहे. मजुरांचा रोज देता देखील येत नाही. एवढी बिकट परिस्थिती शेतकऱ्यांवर येऊन ठेपली आहे. आमच्या दुधासाठी, कांद्यासाठी आणि सगळ्या शेतमालासाठी संसदेत भांडा अशी विनंती खासदार डॉ.कोल्हे यांच्याकडे केली. बिबट्याचे हल्ले, कांदा, सोयाबीन, दुधाच्या बाजारभावबद्दल संसदेत आवाज उठवल्याबद्दल खासदार डॉ. कोल्हे यांचे आभार मानले. पुन्हा संसदेत जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**बाजारभाव देण्यास मोदी गॅरंटी नाही...**

**» खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्र सरकारवर टीका केली ते म्हणाले की, "अगोदर ४०% कांदा निर्यात शुल्क लाधला त्यातच जपानवरून घाईघाईने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करून कांदा आम्ही खरेदी करणार म्हणून सांगितलं आणि कांद्याचे भाव पाडले, किलोमागे कांदा उत्पादक शेतकर्यांचे ३० रुपये नुकसान होत आहे. शेतकऱ्याच्या आशेवर पाणी फिरवण्याचे काम मोदी सरकारने केलं आहे. पंतप्रधान प्रत्येक गोष्टीची गॅरंटी देतात परंतु शेतकऱ्यांच्या मालाला बाजारभाव देण्याची गॅरंटी देऊ शकत नाही हे दुर्दैव आहे. त्याचबरोबर मध्यप्रदेशच्या निवडणूका झाल्यापासून अजूनही देशाला पूर्णवेळ कृषिमंत्री नसावा हे आपल्या देशाचे दुर्दैव आहे" ते म्हणाले.**

# पुण्यात हलक्या पावसाची शक्यता

## पुण्यात 7 आणि 8 एप्रिल रोजी शहरात हलका पाऊस पडण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील किमान तापमान सरासरीच्या पातळीत घसरण झाल्याने पुणेकरांना गेल्या काही दिवसांच्या उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळू शकतो. भारतीय हवामान शास्त्र विभागाने (आयएमडी) दिलेल्या माहितीनुसार,शुक्रवारपासून हवेत आद्रता वाढून पाच ते आठ एप्रिल दरम्यान मध्य महाराष्ट्रात. सहा ते आठ एप्रिल या काळात कोकण, मराठवाड्यात आणि सात ते आठ एप्रिल दरम्यान विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

पुण्यात उन्हाचा कडाका जाणवत असून गेल्या काही दिवसांपासून किमान (रात्रीचे) तापमान सरासरीपेक्षा अधिक आहे. 29 मार्च रोजी शिवाजीनगर येथे रात्रीचे सर्वाधिक तापमान 23.4 अंश सेल्सिअस नोंदले गेले, जे सरासरीपेक्षा 6.1 अंश सेल्सिअसने अधिक आहे. कोरेगाव पार्क, वडगाव शेरी आदी भागात रात्रीचे तापमान 26 ते 27 अंश सेल्सिअसच्या दरम्यान नोंदले गेले.

1 एप्रिलपर्यंत रात्रीचे तापमान 22 अंश सेल्सिअस नोंदले गेले. मात्र, 2 एप्रिल रोजी तापमानात तीन ते चार अंश सेल्सिअसने घट झाली असून शिवाजीनगर येथे 18.9 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. कोरेगाव पार्क आणि मगरपट्टा या भागात तापमान अनुक्रमे 23.9 आणि 25.2 अंश सेल्सिअसपर्यंत घसरले.

मंगळवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंत किमान तापमानाचा पारा 22.4 वरून 18.9 अंश सेल्सिअसपर्यंत घसरला.शहर आणि परिसरात पुढील चार दिवस म्हणजे शनिवारी (दि.6) दुपारपर्यंत आकाश निरभ्र राहून दुपारनंतर



**हलक्या पावसाची शक्यता..**

पुढील पाच दिवस पुण्यात प्रामुख्याने आकाश निरभ्र राहील, मात्र या कालावधीत दुपार किंवा सायंकाळच्या वेळी अंशत: ढगाळ वातावरण राहील. 7 व 8 एप्रिल रोजी शहरात ढगाळ वातावरण राहणार असून हलक्या पावसाची शक्यता आहे, असं हवामान खात्यां सांगितलं आहे.पुढील अंदाजानुसार येत्या काही दिवसांत किमान तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता असली तरी पुढील 72 तास दिवसाचे तापमान उच्चांकी पातळीवर राहील. पुण्यात येत्या 48 तासांत कमाल तापमान 40 अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

आकाश ढगाळ होईल. त्यानंतर रविवार आणि सोमवारी आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता असून, हलक्या स्वरूपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला (PUNE) आहे. विदर्भातील ब्रह्मपुरी येथे मंगळवारी 42.3 अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. जळगाव, मालेगाव, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, नांदेड, बीडसह संपूर्ण विदर्भात पारा 40 अंशांवर होता.

पुढील दोन दिवस तापमानात एक ते दोन अंशाने वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरासह जिल्ह्यातील उन्हाचा चटका आणखीन वाढणार. नागरिकांनी उष्माघातापासून वाचण्यासाठी काळजी घ्यावी. दुपारच्या वेळी घराबाहेर जाणे टाळावे,असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.